**प्रेस नोट** **दिनांक २२/१२/२०१७.**

## अवयव दानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मुंबई ते नागपुर रनिंग !

## डॉ श्री मितेश रांभिया व त्यांचे सहकारी यांचे पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये स्वागत !

डॉ. श्री. मितेश रांभिया व त्यांचे सहकारी श्री. शंकर भावसार, भुषण बरगट यांनी समजाला अवयवाची निगा राखणे व त्यांचे दान करण्याबाबतचा संदेश देण्यासाठी मुंबई ते नागपुर असा रनिंग चे आयोजन केले आहे. महामार्गावरील सर्व गावांमध्ये लोकांशी भेटुन त्यांना अवयवाचे संवर्धन करुन अवयव दानाचे महत्त्व समाजावून सांगत आहेत. तसेच ठिक-ठिकाणी लोकांकडुन अवयवदानाचे फॉर्म भरुन घेतल्या जात आहेत.

यामध्ये स्वत: डॉ मितेश रांभिया हे त्यांच्या सहकाऱ्यांसह मुंबई येथुन रनिंग करत आज पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना येथे दाखल झाले असता श्री. रामनाथ पोकळे, पोलीस अधीक्षक, जालना यांनी स्वागत करुन पुढील प्रवासास शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच पोलीस बॅडच्या पथकाने संचलन करुन भव्य स्वागत केले. तसेच त्यांच्या कामाबद्दल माहिती करुन घेतली.

यावेळी श्रीमती लता फड, अपर पोलीस अधीक्षक, जालना, श्री. राठोङ जिल्हा शल्य चिकीत्सक, जालना, श्री, राजेंदसिंह गौर, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, डॉ. कैलास सचदेव व जालना शहरातील प्रतिष्ठीत नागरीक हजर होते. यावेळी सर्वांनी डॉ. मितेश रांभिया यांचे स्वागत केले व सुभेच्छा दिल्या.